# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.11.2025** **वारःरविवार**

---

जी-२० शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर
पंतप्रधान मोदी आज ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेच्या नेत्यांच्या बैठकीला उपस्थित राहणार
ऑस्ट्रेलिया-कनडा- आणि भारत यांच्यातील तंत्रज्ञान आणि नवोन्मेष सहकार्यासाठी त्रिपक्षीय भागीदारीची घोषणा
देश सर्वप्रथम या तत्त्वानुसार राष्ट्रनिर्माण हे सर्व संस्थांचं ध्येय असायला हवं –राष्ट्रपतींचं प्रतिपादन
आणि
ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेनचा अंतिम फेरीत प्रवेश

**<u>जीवीस</u>**
दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथं सुरू असलेल्या जी-२० नेत्यांच्या शिखर परिषदेत काल झालेल्या एका सत्रात बोलताना पंतप्रधान मोदी यांनी जागतिक पारंपरिक ज्ञान भांडाराची स्थापना, जी-२० आफ्रिका-कौशल्यवाढ उपक्रमाची सुरुवात, जी-२० जागतिक आरोग्य प्रतिसाद पथकाची निर्मिती, अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी उपक्रम असे महत्त्वपूर्ण प्रस्ताव आपल्या भाषणातून मांडले.
या परिषदेत सहभागी झालेल्या जागतिक नेत्यांनी काल अमेरिकेचा विरोध डावलून संयुक्त जाहीरनाम्याला एकमतानं मंजूरी दिली. या जाहीरनाम्यात हवामान विषयक जागतिक संकटासह, विविध जागतिक समस्यांचा अंतर्भाव आहे. हा निर्णय आफ्रिका खंडासाठी एक महत्त्वाचा टप्पा असून, बहुपक्षवादाला मिळालेलं मोठं पाठबळ असल्याची प्रतिक्रिया दक्षिण आफ्रिकेचे आंतरराष्ट्रीय संबंध आणि सहकार्य मंत्री रोनाल्ड लामोला यांनी व्यक्त केली.

जी-२० नेत्यांच्या शिखर परिषदेची आज सांगता होत आहे. या शिखर परिषदेच्या तिसऱ्या सत्राला पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संबोधित करणार आहेत. "सर्वांसाठी निष्पक्ष आणि न्याय्य भविष्य - महत्वपूर्ण खनिजे, योग्य कार्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता" ही या सत्राची मुख्य संकल्पना आहे. या सत्रापूर्वी, पंतप्रधान मोदी आज भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका या देशांच्या नेत्यांच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान G20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी काल विविध देशांच्या प्रमुख नेत्यांची भेट घेतली. ब्रिटनचे पंतप्रधान केर स्टारमर, मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष

इमॅन्युएल मॅक्रॉन, जर्मनीचे चान्सलर फ्रेड्रिक मर्ज, दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे-म्युनग, ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा आणि संयुक्त राष्ट्रांचे महासचिव ऍंटोनियो गुटेरेस यांची मोदी यांनी भेट घेतली. तसंच सिएरा लियोनचे राष्ट्राध्यक्ष जुलियस माडा बिओ आणि सिंगापूरचे पंतप्रधान लॉरन्स वॉंग यांच्याशीही संवाद साधला.

पंतप्रधान मोदी आजही विविध देशांच्या नेत्यांबरोबर द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा, जपानचे पंतप्रधान साने टाका, कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यासमवेत पंतप्रधान द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. त्यानंतर आज संध्याकाळी ते मायदेशी परतणार आहेत.

**<u>एसीआयटीआय</u>**

भारत, ऑस्ट्रेलिया आणि कनडा या तीनही देशांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासाठी ऑस्ट्रेलिया-कनडा-भारत तंत्रज्ञान आणि नवोन्मेष म्हणजेच एसीआयटीआय त्रिपक्षीय भागीदारीची घोषणा करण्यात आली आहे. जी 20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान एंथनी अल्बानीज आणि कनाडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक काल झाली; त्यामध्ये ही घोषणा करण्यात आली. एसीआयटीआय सहकार्य भागीदारीमुळे महत्त्वाचं तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रातील सहकार्य आणखी विस्तारेल असं मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. तीनही देशांचा हा संयुक्त उपक्रम प्रमुख्यानं स्वच्छ ऊर्जा, पुरवठा साखळी, महत्वपूर्ण खनिजे या क्षेत्रातील सहकार्य मजबूत करण्यासाठी काम करणार आहे. या अनुषंगानं तीनही देशांचे अधिकारी पुढच्या वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये बैठक घेणार आहेत.

**<u>हवामानपरिषदब्राझील</u>**

ब्राझीलमध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदल विषयक परिषदेत जागतिक नेत्यांनी एका करारवर सहमती दर्शवली आहे. मात्र या करारात हवामान बदलाला कारणीभूत असलेल्या जीवाश्म इंधनाचा वापर, टप्प्याटप्प्याने कमी करण्याचा उल्लेख केलेला नाही. या करारात गंभीर हवामान बदलाच्या संकटांचा सामना करण्यासाठी विकसित राष्ट्रांकडून, विकसनशील देशांना दिल्या जाणाऱ्या मदतीच्या रकमेत किमान तीनपट वाढ करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

देश सर्वप्रथम या तत्त्वानुसार राष्ट्रनिर्माण हे सर्व संस्थांचं ध्येय असायला हवं, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आंध्रप्रदेशात पुट्टपार्थी इथं श्री सत्य साईबाबा यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. आध्यात्मिक संस्थांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात योगदान द्यावं, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं. व्यक्तिगत पातळीवर तसंच समाज म्हणून वैश्विक शांतीला बळ मिळावं, आणि संपूर्ण मानवतेचं कल्याण व्हावं, यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहनही राष्ट्रपतींनी केलं. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>इफफी</u>**

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या ५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात काल 'इट वॉज जस्ट ॲन ॲक्सिडेंट', सूर्या बालकृष्णन यांचा 'दीपा दीदी', 'मॉस्किटोज' आदी चित्रपट प्रदर्शित करण्यात आले. अनुपम खेर त्यांचा 'तन्वी द ग्रेट' हा चित्रपटही प्रदर्शित करण्यात आला. एका खंबीर स्वमग्न मुलीची ही गोष्ट आहे. हिमाचल प्रदेश, तामिळनाडू आणि जम्मू आणि काश्मीरमधील कलाकारांनी काल रंगतदार लोकनृत्य सादर केलं.

**<u>गडकरीनागपुरपुस्तकमहोत्सव</u>**

राष्ट्रीय पुस्तक न्यास, महाराष्ट्र शासन आणि झीरो माईल युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या नागपूर पुस्तक महोत्सवाचं उद्घाटन केंद्र मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते काल नागपूरमध्ये झालं. रेशीमबाग मैदानावर पुढचे नऊ दिवस हा महोत्सव होणार आहे. उद्घाटन सत्रात वाचन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करताना, गडकरी म्हणाले की वाचन हे केवळ मनोरंजन नाही तर व्यक्तिमत्व विकासाचाही भाग आहे. भारत देश हा ज्ञानाचे भांडार आहे आणि देशाचा गौरवशाली इतिहास, संस्कृती आणि परंपरा ही आपली मोठी ताकद आहे. देशाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी आवश्यक असलेलं ज्ञान पुस्तकं वाचून मिळतं असं ही त्यांनी सांगितलं. या पुस्तक महोत्सवात 300 पेक्षा जास्त प्रकाशक सहभागी झाले असून, या महोत्सवात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>हज</u>-**

हज यात्रेशी संबंधित सर्व प्रक्रिया डिजिटल करून मानवी हस्तक्षेप दूर करण्याच्या सूचना केंद्रीय अल्पसंख्याक सचिव चंद्र शेखर कुमार यांनी भारतीय हज समितीला दिल्या आहेत. मुंबईत झालेल्या हज परिषदेत ते बोलत होते. हज यात्रेकरूंच्या थकीत रकमेपैकी ७५ टक्के त्वरित आणि उर्वरित २५ टक्के निर्धारित पडताळणी पूर्ण केल्यावर देण्याचे आदेश त्यांनी दिले. गेल्या आठवड्यात मृत्युमुखी पडलेल्या हज यात्रेकरूंना यावेळी आदरांजली वाहण्यात आली.

**<u>तेजसनमान्शस्याल</u>**

दुबई एयर शोमध्ये तेजस या लढाऊ विमानाला झालेल्या दुर्घटनेत विंग कमांडर नमांश स्याल यांना वीरमरण आलं; त्यांचा पार्थिव देह काल भारतात आणण्यात आला. तत्पूर्वी संयुक्त अरब अमीराती मधले भारतीय राजदूत दीपक मित्तल आणि महावाणिज्य दूत सतीश सिवन यांनी विंग कमांडर नमांश स्याल यांना श्रद्धांजली अर्पण केली. संयुक्त अरब अमीरातीच्या सुरक्षा दलांतर्फे त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

**<u>बॅडमिंटन</u>**

भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत लक्ष्यने चायनीज तैपेईच्या चाऊ टिएन-चेन याचा १७-२१, २४-२२, २१-१६ असा पराभव केला.

उत्कृष्ट नेट ड्रॉप्स, अचूक स्मॅश आणि आत्मविश्वासपूर्ण फटक्यांच्या बळावर लक्ष्यनं अंतिम फेरी गाठली. लक्ष्य सेनचा अंतिम सामना आज जपानच्या युशी तनाकाशी होणार आहे. चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी पुरुष दुहेरीच्या उपउपांत्य फेरीत पराभूत झाल्यानं स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

**क्रिकेट**

गुवाहाटी इथं सुरु असलेल्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात प्रथम फंलदाजी करताना दक्षिण आफ्रिकेनं काल पहिल्या दिवशी पहिल्या डावात दिवसअखेर ६ बाद २४७ धावा केल्या आहेत. कुलदीप यादवनं तीन बळी घेतले.

**महिलाक्रिकेट**

दृष्टिहीन महिलांच्या टी –ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज भारत आणि नेपाळ यांच्यात अंतिम सामना होणार आहे. काल कोलंबो इथं उपांत्य फेरीत झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर नऊ खेळाडू राखून विजय मिळवला तर उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात नेपाळनं पाकिस्तानचा सात खेळाडू राखून पराभव केला.

**हवामानपूलमाधुरी**

हवामान विभागानं पुढील तीन ते चार दिवसदेशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये सौम्य ते मध्यम धुक्याचा अंदाज वर्तवला आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, केरळ, लक्षद्वीप, तमिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकल इथं आज विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे. दरम्यान, नवी दिल्लीत हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली आहे.आज सकाळी वायू गुणवत्ता निर्देशांक ३८१ नोंदवला गेला.

दरम्यान प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी दिल्ली सरकारने, दिल्लीतल्या कामगार क्षमतेच्या ५० टक्के कामगारांनी कार्यालयातून तर उर्वरित कर्मचाऱ्यांनी घरूनच काम करण्याबाबत निवेदन जारी केलं आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**